ePaper

| वर्ष - 7 । अंक -50 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | ।शुक्रवार, दि. 16 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## उद्धव ठाकरेंसाठी भाजपाची दारं खुलीच : केशवप्रसाद मौर्य




### आतील पानांत

- पुणेकरांना पाणीटंचाईची भीती!
- 'मोदी@9 जनसंपर्क
- सत्तेतील कुरघोडी!


## आयुक्त शेखर सिंह यांच्याकडून विद्यार्थ्यांचे स्वागत

# शाळांची 'घंटा वाजली'!



### शाळांच्या आवारात ढोल-ताशांचा गजर अन् भारत माता की जयचा नारा!

।पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**"भारत माता की जय" असा जयघोष करत ढोल ताशांच्या गजरात, लेझीमच्या तालावर उत्साही आणि आनंदी वातावरणात विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने शाळेची घंटा आज वाजली. नवी उमेद आणि आशा घेऊन महापालिका शाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे त्यांच्या पालकांसह मोठ्या हर्षोल्हासात महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्यासह अधिकाऱ्यांनी पुष्प देऊन स्वागत केले.**




आयुक्त शेखर सिंह यांनी आज अजंठा नगर येथील माता रमाबाई भीमराव आंबेडकर प्राथमिक शाळेत जाऊन विद्यार्थ्यांचे पुष्प देऊन स्वागत केले तसेच त्यांच्याशी संवाद देखील साधला. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शिक्षण विभागाचे सहाय्यक आयुक्त विजयकुमार थोरात, प्रशासन अधिकारी संजय नाईकडे तसेच शाळेचे मुख्याध्यापक आणि शिक्षक उपस्थित होते. बालवाडीपासून या शाळेत विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. महापालिकेने शालेय विद्यार्थ्यांना गणवेश, पुस्तके, दप्तर, बुट अशा विविध शालेय वस्तू शाळेच्या पहिल्याच दिवशी उपलब्ध होतील याकडे कटाक्षाने लक्ष दिले आहे. त्यानुसार महापालिका शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना अशा वस्तू उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

महापालिकेच्या इतर शाळांमध्ये देखील पालक, शिक्षक आणि महापालिका अधिकारी यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचे स्वागत करुन शाळेचा पहिला दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळा परिसर तसेच वर्गखोल्या सजवण्यात आल्या होत्या.

### महापालिका शाळांच्या गुणवत्तेत भर

महानगरपालिकांच्या शाळांमध्ये मोफत व दर्जेदार शिक्षण दिले जाते. महापालिकेच्या शाळांमध्ये ई – क्लास उपक्रमांतर्गत प्रत्येक वर्गात स्मार्ट टी. व्ही. संगणक आणि गणित कक्ष यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण आणि शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर शक्य झाला आहे. महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये पहिल्याच दिवशी सर्व विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकांचे वाटप करण्यात आले आहे. तसेच शाळा गणवेशदेखील पहिल्याच दिवशी दिला जात आहे. यावर्षी महापालिका शाळांमध्ये विविध प्रकारचे उपक्रम राबविले जाणार आहेत. यामध्ये क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी शाळांमध्ये केली

### शालेय साहित्यासाठी आर्थिक मदत

१० शालेय साहित्यापोटी पहिली ते चौथी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना ३५०० रुपये तर पाचवी ते आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना ३७०० रुपये यावर्षीपासून डीबीटीद्वारे पालकांच्या खात्यावर जमा केले जाणार आहेत. दर्जेदार साहित्याचा बाजारभाव बघून ही रक्कम निश्चित करण्यात आली आहे. या योजनेला यशस्वी करण्यासाठी पालकांनी सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त शेखर सिंह यांनी केले. महापालिका शाळांच्या पटसंख्येत वाढ होऊन याठिकाणी प्रवेश घेण्यासाठी इच्छा निर्माण व्हावी असे पालकांना वाटले पाहिजे, असे काम महापालिका शिक्षकांनी करावे अशी सुचनाही आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

## 'शासन आपल्या दारी उपक्रमाअंतर्गत' विविध दाखल्यांचे वाटप

### शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांची माहिती

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केंद्र, राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ थेट आणि सुलभ व्हावा यासाठीचे दाखले पिंपरी-चिंचवडकरांना एकाच छताखाली मिळणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज विविध लाभांचे वाटप, दाखले नागरिकांना देण्यात येणार आहेत. तसेच निगडी येथील महात्मा बसवेश्वर महाराज पुतळ्याचे अनावरणही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.**

याबाबतची माहिती शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी पत्रकार परिषदेत दिली. जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, शहरप्रमुख निलेश तरस उपस्थित होते. राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारला 30 जून रोजी एक वर्ष पूर्ण होत आहे. यानिमित्त राज्यभरात सरकारच्या माध्यमातून शासन आपल्या दारी या उपक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. याच अंतर्गत शुक्रवारी थेरगावातील पद्मजी मीलच्या बाजूच्या मैदानात दुपारी



अडीच वाजता शासन आपल्या दारी हा उपक्रम मुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत होणार आहे. यासाठी आमदार महेश लांडगे, अश्विनी जगताप, उमा खापरे आदी उपस्थित राहणार आहेत.

# पुणेकरांना पाणीटंचाईची भीती!

## प्रशासनाला चिंताः खडकवासला धरण साखळीने गाठला तळ

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळी प्रकल्पात सध्या फक्त पाच अब्ज घनफूट (टीएमसी) पाणी शिल्लक राहिले आहे. जिल्ह्यातील एकूण ३१ धरणांपैकी बहुतांश धरणांमधील पाणीसाठ्याने तळ गाठल्याचे जलसंपदा विभागाच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे येत्या काही आठवड्यांत जिल्ह्यात पाऊस न झाल्यास पाणीटंचाईच्या संकटाला सामोरे जावे लागण्याची भीती आहे.**



जून महिना सुरू झाल्यानंतर नागरिकांसह शेतकरीही आता मान्सूनच्या प्रतीक्षेत आहेत. तरीही काही भागांत अवकाळी पावसानेच हजेरी लावली आहे. खडकवासला धरण साखळी प्रकल्पातील खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या धरणांतून पुणे शहराला पिण्यासाठी; तसेच ग्रामीण भागाला शेतीसाठी पाणीपुरवठा करण्यात येतो. या चारही धरणांतील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. जलसंपदा विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार पुण्यातील बहुतेक धरणातील पाणी साठा तळाला गेला आहे. येत्या काही दिवसांत पाऊस न पडल्यास पुणेकरांना पाण्याची कमतरता भासू शकते. तसेच शेतकरी सुद्धा पावसाची प्रतीक्षा करत आहेत.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळीत बुधवारी (१४ जून) ५.०५ टीएमसी (१७.३१ टक्के) पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. खडकवासल्यामध्ये १.०३ टीएमसी, पानशेतमध्ये १.३५ टीएमसी, वरसगाव धरणामध्ये २.५३ टीएमसी आणि टेमघरमध्ये ०.१३ टीएमसी पाणी शिल्लक असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले. पिंपरी-चिंचवडला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणातील पाणीसाठाही घटून १.७६ टीएमसीवर गेला आहे.

### जिल्ह्यातील धरणांतील साठा घटला

**» पुणे जिल्ह्यात ३१ धरणे असून, बहुतांश धरणांनी तळ गाठल्याचे चित्र आहे. त्यामुळे पाऊस पडला नाही, तर ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. नीरा उजवा काल्यातून सोडण्यात आलेले पाणी बंद करण्यात आले आहे. नीरा डाव्या कालव्यातून येत्या २१ जूनपर्यंत शेतीसाठी आवर्तन सोडण्यात येणार आहे. त्यानंतर शिल्लक पाणी पिण्यासाठी वापरले जाईल. जिल्ह्यातील सर्व धरणांमधील पाण्याचे १५ जुलैपर्यंत नियोजन करण्यात आले आहे. त्यानुसार शिल्लक पाणीसाठ्याचे नियोजन केले जाईल, असेही जलसंपदा विभागाने सांगितले.**

### धरणांतील पाणीसाठा

| » धरण | उपयुक्त साठा (टीएमसी) टक्के |
|---|---|
| » खडकवासला | १.०३ ५१.९९ |
| » पानशेत | १.३५ १२.७१\ |
| » वरसगाव | २.५३ १९.७५ |
| » टेमघर | ०.१३ ३.५९ |
| » पवना | १.७६ २०.६४ |
| » भामाआसखेड | १.९८ २५.५७ |
| » मुळशी | १.०८ ५.३४ |

# लोहगाव धावपट्टीच्या विस्तारीकरणासाठी पाऊल पुढे!

## » संरक्षण मंत्रालयाकडून 'ग्रीन सिग्नल'

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पुण्याच्या लोहगाव विमानतळावरील धावपट्टीच्या विस्तारीकरणाच्या दृष्टीने बुधवारी सकारात्मक पाऊल पुढे पडले आहे गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पुण्याच्या लोहगाव विमानतळावरील धावपट्टीच्या विस्तारीकरणाच्या दृष्टीने बुधवारी सकारात्मक पाऊल पुढे पडले आहे. महापालिका आणि हवाई दलाने निश्चित केलेल्या बदलांना संरक्षण मंत्रालयाकडून 'ग्रीन सिग्नल' मिळाल्यास सध्याच्या धावपट्टीचा विस्तार होणे शक्य असून, त्यानंतर युरोपमधील विमाने पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरणे शक्य होणार असल्याचा दावा महापालिकेने केला आहे.**



लोहगाव येथे हवाई दलाच्या कार्यालयात बुधवारी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत काही महत्त्वाच्या निर्णयांच्या दृष्टीने महापालिका आणि हवाई दलामध्ये सहमती झाली. विमानतळानजीकच्या विकफिल्ड चौक ते लोहगाव दरम्यानच्या रस्ता हवाई दलाकडे हस्तांतरित करून त्या बदल्यात पर्यायी रस्ता तयार करण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्या दृष्टीने आज, गुरुवारी प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली जाणार असून या संदर्भात पुढील प्रक्रिया लवकर पूर्ण व्हावी, यासाठी पाठपुरावा केला जाणार असल्याचे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

### रस्ता बंद करून मार्ग

लोहगाव येथील विमानतळाची धावपट्टी सध्या २५०० मीटर लांबीची असून, मोठी विमाने उतरण्यासाठी किमान तीन हजार मीटरची धावपट्टी गरजेची आहे. त्या दृष्टीने धावपट्टीच्या पश्चिम दिशेला त्याचे विस्तारीकरण करण्यासाठी आवश्यक जागा उपलब्ध आहे. महापालिकेचा सध्याच्या वापरातील रस्ता बंद करून पर्यायी मार्ग निर्माण केल्यास या विस्तारीकरणाला चालना मिळणार असून नव्या रस्त्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमातील तरतुदींनुसार प्रक्रिया करण्याची तयारी पालिकेने दर्शविली आहे.

### 'मिसिंग लिंक'ची जागा

विमाननगर येथून थेट लोहगाव विमानतळावर पोहोचण्यासाठी अडथळा ठरत असलेली १२० मीटर लांबीची जागा महापालिकेच्या ताब्यात देण्यास हवाई दलाने बुधवारी मान्यता दिली. महापालिका आणि हवाई दल यांच्यात बुधवारी झालेल्या करारानुसार १२० मीटर लांबीची; तसेच २० मीटर रुंदीची ही जागा रस्त्यासाठी महापालिकेला मिळणार असल्याने विमाननगर येथून थेट विमानतळाच्या दारात आता पोहोचता येणार आहे. या रस्त्यासाठी हवाई दलाच्या ताब्यातील २३५० चौरस मीटर जागेची आवश्यकता होती.

### अधिकाऱ्यांची उपस्थिती

**» धावपट्टी विस्तारीकरणासह 'मिसिंग लिंक' जोडण्यासाठी महापालिका आणि हवाई दलामध्ये बुधवारी करार करण्यात आला. या बैठकीला हवाईतळाचे प्रमुख एअर मार्शल शेखर यादव, मुख्य प्रशासकीय अधिकारी ग्रुप कॅप्टन संजय पिसे, मनोज गेरा, विंग कमांडर पी. सजनी, विमानतळ संचालक संतोष ढोके, टर्मिनल व्यवस्थापक संतोष दुलारे, महापालिकेचे आयुक्त विक्रमकुमार, अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे उपस्थित होते.**

> “ विमाननगर येथून विमानतळाकडे येण्यासाठीची 'मिसिंग लिंक' जोडण्यासाठी हवाई दलाबरोबर करार केल्याने, विमानतळावर येणाऱ्या प्रवाशांचा वेळ वाचणार आहे. याशिवाय धावपट्टीच्या विस्ताराबाबत सकारात्मक निर्णय झाला आहे. हा विस्तार झाल्यास युरोपमधील विमाने लोहगाव विमानतळावर उतरण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.
>
> **- विक्रमकुमार,** महापालिका आयुक्त तथा प्रशासक

## भाजपा युवा मोर्चातर्फे प्रभावी अंमलबजावणी

# ‘मोदी@9 जनसंपर्क अभियान’!

### कुदळवाडी येथे ‘लाभार्थी संवाद’ चे आयोजन : प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर यांची उपस्थिती





। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**केंद्रातील मोदी सरकारला यशस्वी नऊ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त भाजपा शहराध्यक्ष तथा शिरुर लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने पिंपरी-चिंचवड शहरात 'मोदी@9 जनसंपर्क अभियान'अंतर्गत 'लाभार्थी संवाद' या कार्यक्रमाचे आयोजन कुदळवाडी येथे करण्यात आले.**

यावेळी भाजयुमो महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राहुल लोणीकर, भाजयुमो राष्ट्रीय सचिव तथा महाराष्ट्र प्रभारी गौरव गौतम, सुदर्शन पाटसकर, गणेश वर्पे, अजित कुलथे, संकेत चोंधे, शिवराज लांडगे,रवी जांभुळकर, उदय गायकवाड, संतोष मोरे, सचिन जयभाय हे पदाधिकारी उपस्थित होते.माजी स्वीकृत सदस्य दिनेश यादव यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अनेक लाभार्थी या ठिकाणी उपस्थित होते. सर्व लाभार्थी यांनी आपण कोण-कोणत्या योजनेचा लाभ घेतला? यांची सविस्तर माहिती यावेळी दिली.सर्व समाजातील नागरिकांना सोबत घेऊन भारतीय जनता पार्टी सामान्य नागरिकाला विकासाचा केंद्रबिंदू मानून काम करत आहेत. समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत योजना पोचविण्यासाठी सर्व भारतीय जनता पार्टी चे कार्यकर्ते काम करीत आहेत, अशा भावना राहुल लोणीकर यांनी व्यक्त केल्या.

---

## मानवता सेवाः पालखीतील वारकऱ्यांना मोफत औषधोपचार!

### लोकनेते लक्ष्मण जगताप मित्र परिवार आणि चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट यांचा उपक्रम

। पिंपरी । महाईन्यूज

**महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायाला ज्या क्षणाची आस लागून असते, त्या आषाढी वारीला टाळ आणि मृदंगाच्या गजरात सुरुवात झाली. राज्याच्या कोनाकोपऱ्यातून संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोबत दिंड्या पुणे मुक्काम उरकून आज लोणी काळभोर आणि सासवड येथे दाखल झाल्या. जगद्गुरू श्री संत तुकाराम आणि संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीने पंढरपूरकडे प्रस्थान ठेवले आहे.**



वारीत सर्वत्र हरिनामाचा गजर सुरू झाला आहे. पुणे शहरातून माऊलींच्या पालखीचं प्रस्थान दिवे घाट मार्गे सासवडला तर तुकोबांच्या पालखीचे ने आज लोणी येथे विसावा घेतला. जय हरी विठ्ठलाचा गजर करत संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीने अवघड असा दिवे घाट पार केला. त्याबरोबर वैष्णवाचा मेळाही हा अवघड घाट अगदी आनंदात पार करत होता.

आज हा सोहळा वारकरी याची देही याची डोळा बघणार असल्यानं आणि वारीत सहभागी होणार असल्यानं वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत असल्याचे दिसत होते. मोठा टप्प्या पार केल्यावर अनेकांना या चढाई चा थोडाफार त्रास झाला, या वारकऱ्यांच्या थकव्यावर चंद्ररंग चॅरिटेबल ट्रस्ट आणि लोकनेते लक्ष्मण जगताप मित्र परिवाराच्या वतीने या वारकऱ्यांना मोफत औषधे व सर्व उपचार देऊन मानवतेचे दर्शन घडविल्याचे आज पाहायला मिळाले. सकाळी ९ वाजता सुरू झालेली ही आरोग्य सेवा रात्री ११ वाजेपर्यंत अखंडपणे सुरू होती.

---

## आई, सासूचा सांभाळ न केल्यास नोकरी जाणार!

### पिंपरी-चिंचवड महापालिकेचा कर्मचाऱ्यांना हिसका

। पिंपरी । महाईन्यूज ।

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विविध विभागांमध्ये अनेक कर्मचारी काम करीत होते. मात्र, मुलगा व सुनांना नोकरी नसल्याने त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेत लाड-पागे अंतर्गत आपली मुले व सुनांना त्यांच्या जागेवर नोकरी दिली. मात्र, पालिकेची हक्काची नोकरी मिळाल्यानंतर पोटच्या पोरांनीदेखील आई-वडिलांकडे पाठ फिरवल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यामुळे अशा कर्मचाऱ्यांवर महापालिका प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारला आहे. महापालिकेमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांपैकी ३६७ कर्मचारी हे लाड-पागे अंतर्गत कामावर रुजू झाले आहेत. म्हणजेच आई, वडील यांच्या जागेवर त्यांचा मुलगा किंवा सून वारसनोंदीने कामावर रुजू होतात. आरोग्य विभागामध्ये काम करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांनी निवृत्त होण्यास काही वर्षे बाकी असताना स्वेच्छानिवृत्ती घेऊन अशा पद्धतीने आपल्या वारसांना कामाला लावले आहे.



#### कर्मचाऱ्यांचे करणार समुपदेशन

**आई, वडील तसेच सासूचा सांभाळ न करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे समुपदेशन करण्यात येणार आहे. वायसीएम रुग्णालयातील सामाजिक कार्यकर्ते महादेव बोत्रे हे या कर्मचाऱ्यांचे समुपदेशन करणार आहेत.**

#### सांभाळ करणार : वारसांचे लेखी हमीपत्र

**लाड-पागे अंतर्गत वारसांना कामावर रुजू करतेवेळी त्यांच्याकडून आई, वडील तसेच सुनेला काम देणार असेल तर सासू - सासरे यांचा सांभाळ करण्याचे लेखी घेण्यात आले आहे. त्यामुळे त्यांनी त्यांचा सांभाळ करणे बंधनकारक असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.**

लाड-पागे अंतर्गत वारसाला नोकरी मिळाल्यानंतर त्यांनी ज्यांच्या जागेवर नोकरी मिळाली आहे, त्यांचा सांभाळ करणे आवश्यक आहे. मात्र, अनेक मुले व सुनांनी नोकरी मिळाल्यानंतर त्यांच्याकडे पाठ फिरविल्याचे चित्र आहे. त्याबाबत स्वेच्छानिवृत्ती घेतलेले कर्मचारी सातत्याने तक्रार करीत आहेत. त्यामुळे प्रशासनानेदेखील आई-वडील व सासूचा सांभाळ न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. आई, वडील व सासूचा सांभाळ न करणाऱ्या ४ कर्मचाऱ्यांना नोटीस दिली आहे.

# सत्तेतील कुरघोडी!



भूमिका
निलेश दुटाळ
91- 87668 40811

**राजकारण आणि सत्ता जिथे असते तिथे महत्वाकांक्षा प्रभावीपणे काम करीत असते. राजकारणात सत्तापदे घेण्यासाठी प्रत्येक पक्षाला जशी आपली रेषा मोठी करावी लागते तसाच प्रयत्न व्यक्तिगत स्वरूपात सुद्धा आपापल्या प्रभाव क्षेत्रात नेत्यांना करावा लागतो. त्याच्यापेक्षा मी कसा श्रेष्ठ आहे हे दाखवून देण्याची अनेकदा चढाओढ निर्माण होते. जेव्हा समान उद्देश घेऊन दोन पक्ष एकत्र येतात त्यांच्यातही कधीतरी अशी चढाओढ सुरु होते, राजकारणात ते अपरिहार्य असते.**

आपले घोडे पुढे दामटण्यासाठी स्वतःची रेष मोठी करणे शक्य नसले की इतरांची रेष खोडण्याच्या कला असंख्य प्रकारे विकसित केल्या जातात. सत्ताधारी भाजप सेनेत सध्या सुरु झालेला कलगीतुरा याच मानसिकतेचे लक्षण म्हटला पाहिजे. पुढील महिन्यात ज्याची वर्षपूर्ती आहे अश्या सरकारमधील जाहिरात युद्ध आणि कथित सर्व्हे दोघांमध्ये सर्व आलबेल नाही हे सांगण्यास पुरेसे आहे याची साक्ष पटते.



दोन दिवसांपूर्वी राज्यातील मोठ्या वर्तमान पत्रात " राष्ट्रात मोदी,महाराष्ट्रात शिंदे " अशी पानभर जाहिरात प्रकाशित झाली. या जाहिरात मध्ये मुख्यमंत्री पदासाठी एकनाथ शिंदे याना देवेंद्र फडणवीस यांच्या पेक्षा कशी कमी पसंती आहे याची टक्केवारी मांडण्यात आल्यामुळे हा मजकूर भाजपच्या जिव्हारी लागल्याचे दिसते. देवेंद्र फडणवीस कसलेले नेते आहेत त्यामुळे त्यांनी यावर काहीही प्रतिक्रिया न देता कृतीतून आपली नाराजी व्यक्त करताना मुख्यमंत्री शिंदे यांच्या सोबत असणाऱ्या दोन कार्यक्रमांना कानदुखीचे कारण देऊन दांडी मारल्याचे दिसले. भाजपचे प्रदेशाध्यक्ष बावनकुळे आणि टीम देवेंद्र मधील प्रवीण दरेकर यांनी या प्रकारावर नाराजी व्यक्त केली यावरून भाजपमध्ये या जाहिरातीची मिरची किती तिखट लागली हे दिसून आले. सत्ता हातात घेऊन उणेपुरे वर्षही न झालेल्या युतीत कुरबुरी वाढल्या यामागे मित्रापेक्षा आपण वरचढ हीच भावना असल्याचे उघड झाले आहे.

ना. शिंदे यांच्या नेतृत्वातील सेनेचे कोण सल्लागार आहेत माहित नाही पण त्यांनी जाहिरात प्रकाशित करून मित्रपक्ष आणि विरोधक अश्या दोघांनाही एकाचवेळी कुरघोडी करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. शिंदे गट उठता बसता ज्यांचे नाव घेते, ज्यांच्या विचारांसाठी आपण उठाव केल्याचे सांगतात त्याच बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या तसबिरींचा नेमका विसर कसा काय पडतो याचा साधा विचारही या सल्लागाराने केला नसावा याचे नवल वाटते. भाजप सेने युतीमध्ये लोकसभा जागेवरून आधीच कुरबरी वाढल्या आहेत . दोन दिवसांपूर्वी खा. श्रीकांत शिंदे यांची खदखद समोर आली आणि त्यांनी भाजपला निशाणा करीत प्रसंगी आपण खासदारकी सोडायला तयार असल्याचे वक्तव्य केले आहे. हे कमी पडते की काय त्यावर या जाहिरातीचा मारा शिंदे गटाने करून मित्रपक्ष भाजपला जणू डिवचले आहे. मतभेदाला या निमित्याने वाट मोकळी झाल्याचे जाणवत आहे.

घाईघाईत कुणाच्याही हातून एकापेक्षा अधिक चुका होत जातात ,या पराकारणी सुद्धा असेच झाल्याचे दिसते. पहिल्या दिवशी दिलेल्या जाहिरात मधील चुका सुधारण्यासाठी दुसऱ्या दिवशी दिलेल्या जाहिरात मध्ये ठाकरे,दिघे यांच्या तसबिरींचा समावेश केला असला तरी खाली वादग्रस्त मंत्र्यांच्या छबी सुद्धा झळकल्या आहेत. पहिली जाहिरात कुणी दिली याची पक्षाला काहीच माहिती नसल्याची चक्क दिशाभूल करणारी माहिती शंभूराज देसाई यांच्या सारखे जबाबदार मंत्री देतात यावरून शिंदे गटाचे नियोजन कसे आहे याची चुणूक जाणवते.

एका चुकीबद्दल सारवासारव करण्यासाठी दुसरी जाहिरात देण्याची खरतर काहीही गरज नव्हती मात्र ती देऊन सेनेने स्वतःचे हसे करून घेतले आहे. या जाहिरातीच्या निमित्याने शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना चेष्टेचा विषय बनली असल्याचे चित्र बघायला मिळत आहे. शिंदे याना हे हे नियोजन करून टाळता आले असते.

आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकात जागा वाटपात भाजप सेनेला वेळेवर गुंडाळून टाकेल आणि शिंदे गटाला त्यांच्या मागे फरफटत जाण्याशिवाय अन्य कोणताही पर्याय नसेल असे करण्यात भाजपवाले माहीर आहेत.

राजकीय डावपेच आखून त्यात सेनेला अडकविण्यासाठी भाजपकडे चाणक्यांची मोठी फळी कार्यरत आहे. त्या तुलनेत शिंदे गट कमी पडताना दिसतो. व्यूहरचनेचा मोठा अभाव राजकारणात मागे खेचत असतो ,वेळीच पक्ष सावरला गेला नाही तर सत्ता नजरेसमोरून निघून जाते. असे जर टाळायचे असेल तर शिंदे गटाला राज्याच्या मानसिकतेचा विचार करीत निवडणूक व्यूहरचना आखणारा चमू आपल्याशी जोडून घ्यावा लागणार आहे. निवडणुका जश्या जवळ येत जातील तश्या भाजपच्या खेळी आणि कारवाया वाढत जातील ,त्यापासून सावध राहून पवित्रे घेणारी यंत्रणा सेनेला विकसित करावी लागेल तरच अशी फजिती पुन्हा होणार नाही.

## संपादकीय »

### घाऊक समाधान; किरकोळ दुःख

***रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने आपले तिमाही पतधोरण जाहीर करताना सातत्याने व्याजदर वाढवत नेले होते. गेल्याच आठवड्यात अनेक तिमाह्यांनंतर प्रथमच रिझर्व्ह बँकेने रेपो दरात वाढ केली नाही.***

कर्जावरील व्याजदरांची संभाव्य वाढही टळली. दरवेळी रेपो दरात वाढ झाली की, सगळ्यांच बँका लगेच ठेवींवरील व्याजदर त्याच प्रमाणात वाढवत नाहीत. मात्र, सातत्याने रेपो वाढत गेला तर ठेवींवरील व्याजदरही वाढत जातात. तसे गेल्या वर्षभरात अनेकदा झाले आहे. ही परिस्थिती दुधारी असते. एकीकडे, व्याजावर चरितार्थ चालणाऱ्या ज्येष्ठांना या वाढीचा आधार वाटतो. त्याचवेळी, कर्जे काढून उद्योग करणाऱ्या किंवा घरे विकत घेणाऱ्यांना वाढीव व्याजदराचा फटका बसत असतो. गेल्या आठवड्यात रेपो दरात बदल न होणे, हे एक सुचिन्ह होते. आता चलनवाढीचा दर उणे ३.४८ टक्के झाल्याचे जाहीरच झाले आहे. उणे चलनवाढ याचाच अर्थ घाऊक महागाई कमी होणे. जवळपास साडेतीन टक्क्यांनी घाऊक महागाई कमी होण्यामुळे अर्थकारणाला मोठीच चालना मिळण्याची शक्यता असते.

**युक्रेनवरील रशियाचे आक्रमण लांबत गेल्याने जगावर अनेक संकटे आली. त्यातले एक संकट उर्जेचे आहे. मात्र, या संकटात सारे जग वेगळा विचार करू लागले आहे. त्या अर्थाने ही एक इष्टापत्तीच ठरते आहे...**

## जगाची ऊर्जावान पावले!

सारे जग अचानक मोठ्या ऊर्जासंकटात सापडते आहे की काय, अशी स्थिती युक्रेन युद्धाने निर्माण झाली. या ऊर्जासंकटाचा सगळ्यांत मोठा तडाखा पश्चिम युरोपला बसणार होता. आजही बसतो आहे. भारत तुलनेने बऱ्या स्थितीत असला तरी हे युद्ध संपणार कधी या प्रश्नाचे उत्तर कुणालाही माहीत नाही. या संकटाचा एक फायदा असा झाला की जगभरात अनेक देशांनी मुख्यत: सौर आणि पवन उर्जेवर प्रचंड भर द्यायला सुरूवात केली आहे. शाश्वत ऊर्जा बाजाराचा अंदाज घेणारा एक अहवाल नुकताच प्रकाशित झाला आहे. त्यातील आकडेवारी सुखावणारी आहे. सध्याचा शाश्वत उर्जेचे पर्याय निवडण्याचा आणि अंगिकारण्याचा वेग असाच राहिला तर कदाचित सन २०२७ मध्ये जगात अपारंपरिक स्रोत हेच सर्वाधिक ऊर्जा पुरविणारे मार्ग असतील, असाही अंदाज या नव्या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. याचा अर्थ, जगावरील कर्बठसा कमी होण्यासाठी उर्जेच्या शाश्वत किंवा अपारंपरिक मार्गांकडे जग वळत नसून पारंपरिक म्हणजे भूगर्भातील तेल, वायू आणि कोळसा यांचा पुरवठा कमी झाला तर काय करायचे, या चिंतेतून जगातील विकसित देश सौर व पवन उर्जेकडे अधिक गंभीरपणे वळत आहेत.

'इंटरनॅशनल एनर्जी एजन्सी'ने म्हटले आहे की, सौर व पवन ऊर्जा निर्मिती यंदा साडेचार हजार गिगावॅटचा टप्पा



ओलांडण्याची शक्यता आहे. ही हनुमानउडीच आहे. चीन आणि अमेरिका हे देश जेवढी वीज तयार करतात; तिथपर्यंत जगातली ही अपारंपरिक ऊर्जानिर्मिती आता पोहोचली आहे. यंदा या पर्यायी ऊर्जास्रोतांमधून मिळणारी वीज किमान ४४० गिगावॅटने जास्त असेल, असे दिसते. जागतिक पातळीवर प्रथमच भारताचे नाव आघाडीच्या पर्यायी ऊर्जास्रोत विकास करणाऱ्या देशांमध्ये घेतले जात आहे. अमेरिका आणि भारत यांनी अपारंपरिक ऊर्जा निर्माण करण्यासाठी झपाट्याने कायद्यांत बदल केले असून त्यामुळे या दोन्ही देशांमध्ये सौर उर्जेचे नवनवीन प्रकल्प उभे राहात आहेत. मात्र, याही क्षेत्रात चीनने घेतलेली आघाडी कायमच आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शिवसेना-भाजपमधील वाद, शिंदे-फडणवीस यांच्यात बंद दाराआड चर्चा!

## » बैठकीत निघाला तोडगा : जाहिरातीवरून झालेला वाद मिटल्याची चर्चा

।नागपूर । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**जाहिरातीवरून सत्ताधारी शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपमध्ये वादाला तोंड फुटलं होतं. पण आता हा वाद मिटल्याची चर्चा आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात चर्चा झाल्याची माहिती आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे चिरंजीव खासदार श्रीकांत शिंदे यांच्या कल्याण-डोंबिवली मतदारसंघात स्थानिक भाजप नेत्यांनी केलेल्या वक्तव्यांनी शिवसेना विरुद्ध भाजप असा वाद पेटला होता.**



मात्र या वादावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत तोडगा निघाल्याचे समजते. सह्याद्री अतिथीगृहात शिंदे आणि फडणवीस यांच्यात गुरुवारी बंद दाराआड चर्चा झाली असून दोन्हीकडच्या नेत्यांनी युतीचा धर्म पाळावा असे सांगतानाच सबुरीचा सल्लाही दिल्याचे समजते. विशेष म्हणजे, यावेळी श्रीकांत शिंदे हेदेखील उपस्थित होते. कल्याण लोकसभा मतदारसंघावर भाजपच्या स्थानिक नेत्यांकडून दावा करणारी वक्तव्ये होत होती. त्यावर श्रीकांत यांनी संताप व्यक्त करताना युतीसाठी मी माझ्या खासदारकीचा राजीनामा द्यायला तयार आहे, असे म्हटले होते. त्यानंतर रवींद्र चव्हाण यांनीही भाजप हा कार्यकर्त्यांचा पक्ष असून या पक्षात कार्यकर्त्यांचे ऐकले जाते, असे वक्तव्य केले होते. त्यामुळे दोन्ही पक्षात तणाव वाढला असतानाच हा तणाव वाढवणारी जाहिरात शिवसेनेकडून दोन दिवसांपूर्वी वृत्तपत्रात छापून आली होती. त्यावरून या दोन्ही पक्षात तणाव निर्माण झाला होता. हे कमी म्हणून की काय एका पोलिस अधिकाऱ्याच्या बदलीच्या मागणीसाठी कल्याण भाजपच्या स्थानिक नेत्यांनी शिवसेनेच्या विरोधात भूमिका घेतली. संबंधित अधिकाऱ्याची बदली होत नाही तोपर्यंत शिवसेनेला सहकार्य करायचे नाही, असा ठरावच मंत्री रवींद्र चव्हाण यांच्यासमक्ष भाजप नेत्यांनी करून घेतला. या घडामोडींवर श्रीकांत शिंदे यांनी संताप व्यक्त केल्याचे समजते. या पार्श्वभूमीवर शिंदे-फडणवीस हे दोन्ही नेते गुरुवारी सकाळी पालघरच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने एकत्र आले होते. त्यानंतर या दोघांची सह्याद्रीवर एक बैठक झाली.

### युतीधर्माचे पालन करा...

**»मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सकाळीच पालघर येथील कार्यक्रमात रवींद्र चव्हाण यांच्याशी चर्चा करून त्यांना सबुरीचा सल्ला देत युतीधर्माचे पालन करण्यास सांगितले. त्यानंतर लगेचच संध्याकाळी सह्याद्री अतिथिगृहात मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्याशीही चर्चा केली. बंद दाराआड झालेल्या या चर्चेदरम्यान भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्याकडून निर्माण केल्या जाणाऱ्या अडचणींचा पाढा श्रीकांत यांनी वाचल्याचे समजते. यावर फडणवीस यांनी येथून पुढे असे घडणार नसल्याचा शब्द दिल्याचे समजते. मात्र त्याचवेळी त्यांना युतीधर्माचे पालन करण्यासही सांगितल्याचे समजते.**

---

## ऑनलाइन गेमिंगद्वारे धर्मांतर: तरुणाच्या मोबाइलमध्ये ३० पाकिस्तानी व्यक्तींचे क्रमांक

। गाझियाबाद ।महाईन्यूज



महाराष्ट्राच्या ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा येथील रहिवासी असलेला शाहनवाझ खान ऊर्फ बड्डू हा किमान सहा ई-मेल पत्ते वापरत होता व त्यापैकी एकाच्या इनबॉक्समध्ये पाकिस्तानातून आलेले ई-मेल होते, असे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले. आरोपीकडून पोलिसांनी दोन मोबाइल फोन आणि त्याच्या संगणकाचा सीपीयू पुढील तपासासाठी जप्त केला आहे. खान हा ऑनलाइन गेमिंगसाठी दोन ई-मेलसह सहा ई-मेल पत्त्यांचा वापर करत होता, असे पोलीस उपायुक्त निपुण अग्रवाल यांनी सांगितले. ठाणे येथून ट्रांझिट रिमांडवर आणण्यात आलेल्या या आरोपीला गाझियाबादच्या न्यायालयात हजर करण्यात आल्यानंतर मंगळवारी न्यायालयाने त्याची १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत रवानगी केली.

उत्तर प्रदेश पोलिसांचा सायबर गुन्हे विभाग शाहनवाझ खानच्या मोबाइल फोनमध्ये सापडलेल्या ३० पाकिस्तानी दूरध्वनी क्रमांकांचे अधिक तपशील मिळवण्याचा प्रयत्न करत असल्याचे अग्रवाल म्हणाले. या क्रमांकांबाबत काही आक्षेपार्ह आढळल्यास पोलीस खान याच्याविरुद्ध कठोर असा राष्ट्रीय सुरक्षा कायदा (एनएसए) लागू करतील, असेही त्यांनी सांगितले. आपल्या मुलाला एका ऑनलाइन ॲपच्या माध्यमातून प्रलोभन दाखवून त्याचे धर्मांतर करण्यात आले, अशी तक्रार कवी नगर भागात राहणाऱ्या एका नागरिकाने ३० मे रोजी पोलिसांकडे तक्रार नोंदवली.

---

## चक्रीवादळ गुजरातला धडकलं!

### » वाऱ्यांचा वेग ताशी 125 किमी, सौराष्ट्र आणि कच्छला तडाखा

। गांधीनगर ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अतितीव्र 'बिपर्जय' चक्रीवादळ गुरुवारी संध्याकाळी गुजरातमधील मांडवी आणि पाकिस्तानातील कराचीच्या दरम्यान जखाऊ बंदराजवळ किनारपट्टीला धडकले. चक्रीवादळाच्या लँडफॉलची (जमिनीवरील प्रवेश) संध्याकाळी साडेसहाच्या दरम्यान सुरू झालेली प्रक्रिया रात्री साडेअकरापर्यंत सुरू होती. प्राथमिक माहितीनुसार वादळाच्या तडाख्यामुळे सौराष्ट्र आणि कच्छमध्ये ठिकठिकाणी झाडे, विजेचे खांब पडण्याच्या घटना घडल्या असून, वादळाचा जोर ओसरताच मदतकार्याला सुरुवात होणार आहे. रात्री उशिरापर्यंत जीवितहानीची नोंद झाली नाही.**



गेले नऊ दिवस अरबी समुद्रावर घोंघावणारे 'बिपर्जय' चक्रीवादळ ताशी १२ किमी वेगाने गुरुवारी संध्याकाळी भारत-पाक सीमेजवळ गुजरात किनारपट्टीला धडकले. या वेळी वादळाच्या केंद्राभोवती फिरणाऱ्या वाऱ्यांचा वेग ताशी ११५ ते १२५ किलोमीटर इतका नोंदला गेल्याची माहिती भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) दिली. गुरुवारी सकाळपासूनच सौराष्ट्र आणि कच्छ क्षेत्रामध्ये सोसाट्याच्या वाऱ्यासह अनेक ठिकाणी मध्यम ते जोरदार पावसाने हजेरी लावली.

#### येथे बसला तडाखा

जखाऊ बंदरासह नारायण सरोवर, नलिया, मांडवी, द्वारका, पोरबंदर, जामनगर, मोरबी आदी ठिकाणांना वादळाचा थेट तडाखा बसला. किनारपट्टीवरील सखल भागांमध्ये वादळाशी संलग्न दोन ते तीन मीटर उंचीच्या समुद्राच्या लाटांचे पाणी शिरले असल्याची शक्यता 'आयएमडी'ने वर्तवली.

#### मदतकार्य सुरू

चक्रीवादळाची आपत्ती लक्षात घेऊन एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या एकूण ४० तुकड्या, तसेच नौदलाच्या २५ तुकड्या बचाव कार्य आणि आपत्ती व्यवस्थापनासाठी सज्ज ठेवण्यात आल्या आहेत.

#### आज, जोर ओसरणार

'आयएमडी'चे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी गुरुवारी रात्री दिलेल्या माहितीनुसार, 'जमिनीवरून प्रवास करताना शुक्रवारी (१६ जून) सकाळी बिपर्जयची तीव्रता अतितीव्र श्रेणीपासून कमी होऊन चक्रीवादळाच्या श्रेणीपर्यंत येईल. ईशान्येकडे सरकताना वादळाची तीव्रता कमी होणार असली तरी, सौराष्ट्र, कच्छसह दक्षिण राजस्थानमध्ये अनेक ठिकाणी जास्त ते अतिजास्त पावसाची शक्यता आहे.'

# पन्नाशी ओलांडली तरी ऐश्वर्या नारकर म्हणते, पतली कमरिया...



मराठी चित्रपट - नाटक विश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री म्हणजे ऐश्वर्या नारकर. त्यांचा चाहतावर्ग मोठा आहे. वयाची पन्नाशी ओलांडली तरी त्यांच्या सौंदर्यातील भर ही चाहत्यांचे लक्ष वेधून घेताना दिसते. सोशल मीडियावर ऐश्वर्या या नेहमीच नेटकऱ्यांना घायाळ करताना दिसतात.

सध्या सोशल मीडियावर तितिक्षा तावडे आणि ऐश्वर्या नारकर यांच्या त्या व्हिडिओनं नेटकऱ्यांना वेडं केलं आहे. पतली कमरिया मोरी, तिर्छी नजरिया मोरी... या व्हिडिओला नेटकऱ्यांनी पसंत केले आहे. त्यावरील प्रतिक्रियाही भन्नाट आहे. गेल्या काही दिवसांपासून ऐश्वर्या नारकर चाहत्यांना आपल्या दिलखेचक अंदाजानं प्रभावित करताना दिसून आल्या आहेत. यापूर्वी देखील इंस्टावर फिटनेस फ्रीकचे व्हिडिओ ऐश्वर्या यांनी शेयर केले आहेत. आताच्या त्यांच्या त्या व्हिडिओवर नेटकऱ्यांनी दिलेल्या प्रतिक्रिया भन्नाट आहे. त्यामध्ये काही मराठी मनोरंजन क्षेत्रातील सेलिब्रेटींनी देखील त्यावर प्रतिक्रिया दिल्या आहेत. अनेकांनी त्या व्हिडिओचे तोंडभरुन कौतूक केले आहे. एका नेटकऱ्यानं तर ऐश्वर्या यांचे कौतूक करावे तेवढे कमीच असल्याचे म्हटले आहे.





सिंगिंग रिॲलिटी शो 'इंडियन आयडॉल 13' सध्या खूप चर्चेत आहे. शोमधील सर्व स्पर्धक आपल्या आवाजाने संपूर्ण देशाची मने जिंकत आहेत. आलेले खास गेस्ट पण स्पर्धकांच्या गाण्यांचे चाहते होतात. दर आठवड्याला एक ना एक सेलिब्रिटी शोमध्ये येतो. आता बी-टाऊनची 'धक धक गर्ल' माधुरी दीक्षित आगामी वीकेंड एपिसोडमध्ये दिसणार आहे. शोमध्ये तिने सर्व गायकांच्या गाण्यांचा आस्वाद घेतला, तसेच तिच्या आयकॉनिक गाण्यावर नृत्यही केले आहे.

# माधुरी दीक्षितने 'चोली के पीछे क्या है'वर केला धमाकेदार डान्स

सोनी टीव्हीने त्यांच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाऊंटवर शोचा नवीनतम प्रोमो शेअर केला आहे. व्हिडिओमध्ये माधुरी दीक्षित 1993 मध्ये आलेल्या 'खल नायक' चित्रपटातील 'चोली के पीचे क्या है' गाण्यावर जबरदस्त परफॉर्मन्स देताना दिसत आहे. तिच्या डान्स मूव्ह आणि स्टाइल तुम्हाला जुन्या माधुरी दीक्षितची आठवण करून देईल.

'इंडियन आयडॉल 13' मध्ये गेस्ट म्हणून दिसलेली माधुरी दीक्षित एका सुंदर अंदाजात दिसली. 55 वर्षीय माधुरीने पिवळ्या लाँग स्कर्टसह एम्ब्रॉयडरी चोली आणि स्टायलिश दुपट्टा घातला होता, ज्यामध्ये ती खूप सुंदर दिसत होती. अभिनेत्रीने हिरवे कानातले घालून तिचा लूक पूर्ण केला. वेवी हेअर, पिंक लिप्स आणि न्यूड मेकअपमध्ये ती कहर करत होती. आजही माधुरी दीक्षित आपल्या फॅशनने तरुण अभिनेत्रींना स्पर्धा देते असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही.

# 'नाहीतर तुम्ही खरंच डिप्रेशनमध्ये जाल..', प्राजक्ता माळी



प्राजक्ता माळी हे नाव सध्या महाराष्ट्राच्या गल्ली-गल्लीत चर्चेत आहे. प्राजक्तानं सोशल मीडियावर काही पोस्ट केली आणि ती चर्चेत आली नाही असं होणं कठीणच. प्राजक्ता सोशल मीडियावर नेहमीच राजकीय,सामाजिक विषयांवर पोस्ट करताना दिसते. तिची प्रशंसा तुफान होते पण तितकंच तिला मोठ्या प्रमाणात ट्रोलिंगचा सामना करावा लागतो. मालिकांमधून प्रकाशझोतात आलेल्या प्राजक्तानं आता मोठ्या पडद्यावरच नाही तर ओटीटी प्लॅटफॉर्मवरही आपल्या नावाचा दबदबा निर्माण केला आहे. रानबाजार या वेबसिरीजमधील तिच्या भूमिकेनं अनेकांच्या भूवया उंचावल्या असल्या तरी प्राजक्तानं केलेल्या कामाची दाद देणारा चाहता वर्गही मोठा होता. आज सोशल मीडियावर तिचे सर्वाधिक फॅन्स आहेत. सध्या तिचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे,ज्यात प्राजक्ताने डिप्रेशनवर स्पष्ट भाषेत आपले विचार मांडले आहेत.

# अभिनेत्री शिल्पा शेट्टीच्या घरी चोरी, दोघेजण ताब्यात



शिल्पा शेट्टीच्या घरी चोरी झाली होती त्या प्रकरणी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतलं आहे. बॉलिवूडची सुप्रसिद्ध अभिनेत्री शिल्पा शेट्टी हिच्या घरी चोरी झाली आहे. शिल्पा शेट्टी जुहूच्या राहत्या घरी चोरी झाली आहे. शिल्पाच्या घरी चोरी झाली आणि या प्रकरणी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतलं आहे. शिल्पाच्या घरी एक आठवड्यापूर्वी चोरी झाली होती. या प्रकरणी तिने पोलिसात तक्रार केली होती. त्यानंतर पोलिसांनी दोन व्यक्तींना ताब्यात घेतलं आहे.

शिल्पा शेट्टीच्या घरातील महागड्या वस्तूंची चोरी झाली होती. त्यानंतर तिने पोलिसात धाव घेतली होती. आठवड्याभरापूर्वी चोरी झाल्यानंतर पोलिसांना आता या प्रकरणात दोघांना ताब्यात घेतलं आहे. मिड-डेने या विषयीचं वृत्त दिलं आहे. पोलिसांनी शिल्पाच्या घरातून चोरी केलेल्या वस्तू जप्त केल्या असल्याचीही माहितीही समोर आली आहे. पोलिसात तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी तातडीने सूत्रं हलवत चोरांचा छडा आठवडाभरात लावला आहे. शिल्पा कायमच तिच्या सिनेमांसह तिच्या फिटनेसमुळेही चर्चेत असते. शिल्पा वयाची ४५ वर्षे उलटूनही अत्यंत फिट ॲंड फाईन आहे. राज कुंद्रावर जे आरोप झाले होते आणि त्याला जे तुरुंगात जावं लागलं होतं त्यावेळीही शिल्पा चर्चेत आली होती.

# पाकिस्तानचा डबल गेम!

## आशिया चषकाची घोषणा झाली अन् बीसीसीआयपुढे पाकिस्तान नमले

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आशिया चषकासाठी घोषणा झाली आणि त्यानंतर एक गोष्ट समोर आली. ही गोष्ट म्हणजे बीसीसीआयने पाकिस्तानचे दुहेरी नुकसान केले असून एकाच दगडात दोन पक्षी मारलेले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय स्तरावर पाकिस्तानला बीसीसीआयने नामोहरम केल्याचे पाहायला मिळाले आहे.आशिया चषकाची घोषणा झाली आणि त्यानंतर पाकिस्तान बीसीसीआयपुढे नमल्याचे स्पष्ट झाले आहे. बीसीसीआयने आता पाकिस्तानची एकाच बाणात दोनदा कशी शिकार केली आहे .**

बीसीसीआयने पाकिस्तानचा कसा केला डबल गेम, जाणून घ्या...



आशिया चषक ही स्पर्धा पाकिस्तानमध्ये आयजित होणार होती. पण बीसीसीआयने पाकिस्तानमध्ये खेळण्यास नकार दिला. त्यानंतर भारत जर पाकिस्तानात येणार नसेल तर आम्ही तिथे जाऊन वनडे वर्ल्ड कप खेळणार नाही, असा पवित्रा पाकिस्तानच्या क्रिकेट मंडळाने घेतला होता. पण आता बीसीसीआयने पाकिस्तानला एकाचवेळी दोन धक्के दिले आहेत. कारण आता आयसीसीने ही स्पर्धा हायब्रीड मॉडेलनुसार होणार आहे, हे स्पष्ट केले आहे. या गोष्टीचा पहिला धक्का पाकिस्तानला असा बसला आहे की, आता त्यांच्या देशात फक्त चारच सामने होणार आहे. त्याचबरोबर अंतिम फेरीचा सामनाही त्यांच्या देशात होणार नाही. संयुक्ती अरब अमिरातीमध्ये खेळण्याचा प्रस्तान पाकिस्तानने भारताला दिला होता, पण तो प्रस्ताव नाकारण्यात आला असून आता हे सामने श्रीलंकेत होतील. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे श्रीलंकेत अंतिम फेरीसह ११ सामने होणार आहेत आणि पाकिस्तान यजमान असूनही त्यांच्याकडे फक्त चार सामने होतील. हा त्यांच्यासाठी पहिला धक्का आहे. त्यानंतर या आशिया चषकाच्या घोषणेसह पाकिस्तान आता भारतामध्ये वर्ल्ड कप खेळण्यासाठी येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे एकाच बाणाने बीसीसीआयने पाकिस्तानची दोनदान शिकार केली आहे. त्यामुळे आता भारत पाकिस्तानात क्रिकेट खेळायला जाणार नाही, पण त्यांना मात्र भारतात विश्वचषकासाठी यावे लागणार आहे. त्यामुळे आता पाकिस्तान बीसीसीआयपुढे नमल्याची जोरदार चर्चा सुरु झाली आहे. आशिया चषक स्पर्धेबाबत आज आयसीसीने घोषणा केली आहे. त्यामुळे आता ३१ ऑगस्टपासून या स्पर्धेला सुरुवात होणार आहे.

### मॅचविनरची होणार एंट्री; रोहितची चिंता मिटली

भारतीय संघाला गेल्या आशिया चषक स्पर्धेत लाजीरवाणा पराभव पत्करावा लागला होता. पण या स्पर्धेत भारताला गोलंदाजीची चिंता सतावत होती. कारण भारताची या स्पर्धेत चांगली होत नव्हती आणि ते पराभवाचे एक मोठे कारण ठरले होते. पण आता भारतीय संघाची ही चिंता मिटणार आहे. कारण या स्पर्धेसाठी आता भारताचा मॅचविनर खेळाडू सज्ज झाला आहे.

गेल्या वर्षी झालेल्या आशिया चषक स्पर्धेत भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमरा हा दुखापतीमुळे खेळू शकला नव्हता. कारण त्यावेळी त्याला दुखापत झाली होती आणि भारतीय संघातून तो बाहेर होता. पण बुमराच्या दुखापतीवर न्यूझीलंडमध्ये शस्त्रक्रीया करण्यात आली आहे. त्यानंतर तो बीसीसीआयच्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये दाखल झाला आहे. या अकादमीमध्ये त्याच्या दुखापतींवर लक्ष ठेवले जात आहे. येथील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार बुमरा आता ऑगस्टपर्यंत फिट होऊ शकतो. त्यामुळे बुमरा आता जरी वेस्ट इंडिजच्या मालिकेत खेळू शकणार नसला तरी तो आशिया चषकासाठी मात्र फिट होऊ शकतो. बुमरा हा संघाला एकहाती विजय मिळवून देऊ शकतो. त्यामुळे तो जर संघात आला तर नक्कीच भारतीय संघ अधिक मजबूत होऊ शकेल. त्यामुळे आशिया चषक स्पर्धेत जर बुमरा भारतीय संघात असेल तर रोहित शर्माची चिंता मिटणार आहे. त्यामुळे आता या स्पर्धेसाठी संघ कधी निवडला जातो, याची उत्सुकता आता सर्वांना लागलेली आहे.

---


# मेस्सीचा अलविदा!

## अर्जेंटीनाकडून पुढचा वर्ल्डकप का खेळणार नाही

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

लिओनेल मेस्सीच्या नेतृत्वाखाली अर्जेंटिनाने गतवर्षी वर्ल्ड कप फुटबॉल स्पर्धा जिंकली. मात्र, आता मेस्सी आगामी २०२६चा वर्ल्ड कप खेळण्याची शक्यता नसल्याचे स्पष्ट झाले आहे. अर्जेंटिना आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात शुक्रवारी लढत होणार आहे, त्यापूर्वी मेस्सीने या विषयावर आपले मत व्यक्त केले आहे.

'मागील म्हणजे २०२२ ची स्पर्धा ही माझी कदाचित अखेरची वर्ल्ड कप स्पर्धा होती, असे मी यापूर्वी अनेकदा सांगितले आहे. पण त्यावेळी ही गोष्ट स्पष्ट झाली नव्हती. पण आता मी पुढचा विश्वचषक खेळणार नसल्याचे ठरवले आहे, त्यामुळे आता पुढच्या



विश्वचषकात मी अर्जेंटीनाकडून खेळताना दिसणार नाही. पण या गोष्टीला अपवादही असू शकतो. कारण भविष्यात काय होईल, हे मी सध्याच्या घडीला सांगू शकत नाही. सध्या मी पुढील विश्वचषक न खेळण्याचे ठरवले आहे. पण जर परिस्थिती बदलली तर कदाचित मला विश्वचषकात खेळावे लागू शकते पण या गोष्टीची शक्यता मात्र कमी आहे.

# सिंधू अपयशाच्या भोवऱ्यात!

## इंडोनेशिया ओपन बॅडमिंटनच्या दुसऱ्याच फेरीत पराभूत

। जकार्ता ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**भारताच्या पी. व्ही. सिंधूचा आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेतील अपयशाचा फेरा इंडोनेशिया ओपन सुपर १००० बॅडमिंटन स्पर्धेतही कायम राहिला. तिला पारंपरिक प्रतिस्पर्धी ताइ झू यिंगविरुद्धच्या लढतीत दुसऱ्या फेरीतच हार पत्करावी लागली. दरम्यान, किदाम्बी श्रीकांत, एच. एस. प्रणॉय यांनी पुरुष एकेरीत, तर चिराग शेट्टी-सात्त्विकसाईराज रांकीरेड्डी यांनी पुरुष दुहेरीतील भारताचे आव्हान कायम राखले.**



इंडोनेशिया ओपन ही या वर्षातील तिसरी सुपर १००० स्पर्धा. ऑलिम्पिक पात्रतेचा कालावधी मेपासून सुरू झाल्यापासूनची सलग ही पाचवी स्पर्धा. यात प्रणॉयचे यश वगळता भारतास काहीही साध्य झालेले नाही. त्यातील सिंधूचे अपयश चिंताजनक आहे. पुरुष एकेरीत श्रीकांतने त्याचा अनुभव पुन्हा एकदा पणास लावून लक्ष्य सेनविरुद्धची यशोमालिका कायम ठेवली. या लढतीत श्रीकांतने ४५ मिनिटांत २१-१७, २२-२० असा विजय मिळवला. सातव्या मानांकित प्रणॉयने हाँगकाँगच्या न्ग का लाँग अँगसचा २१-१८, २१-१६ असा ४३ मिनिटांत पराभव केला. सिंधूने यिंगविरुद्धची लढत १८-२१, १६-२१ अशी ३९ मिनिटांत गमावली. चिराग-सात्त्विकने हे जि तिंग-झोउ हाओ डाँग यांना २१-१७, २१-१५ असे पराभूत केले. प्रियांशू राजवतने अँथनी गिनतिंगला चांगली लढत दिली; पण तो अखेर २२-२०, १५-२१, १५-२१ असा पराभूत झाला.

महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत सिंधूने दोन्ही गेममध्ये चांगली लढत दिल्याचे चित्र निर्माण होते. प्रत्यक्षात तिने क्वचितच आव्हान निर्माण केले. यिंगने सुरुवातीपासून घेतलेले वर्चस्व कधीही गमावले नाही. यिंगने रॅकेटची दिशा ऐन वेळी बदलून सिंधूचा गोंधळ वाढवला. तिला शटलचा योग्य अंदाजच येत नव्हता. बेसलाइन; तसेच साईडलाइनबाबतही तिला नेमकी कल्पना नव्हती. यिंगचा खेळ पूर्ण बहरला नाही. तिच्याकडून काही चुका झाल्या. तेव्हाच सिंधूला गुण जिंकता आले. निराशाजनक कामगिरीमुळे सिंधूची १४व्या क्रमांकावर घसरण झाली आहे.